**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**दैनंदिन प्रेस नोट दि.०५/०१/२०१८**

**दि.०४/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ०४/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | एस.एल.म्हामुनकर,पो. हवा. खडकी पोलीस ठाणे पुणे |
| **आरोपी** | सतिष वसंत शिराळ,रा.भोरी भडकचंदनवाडी वस्ती,उरळी-कांचन,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१८ रोजी ०२/०० वा.होळकर ब्रिज जवळ,भिक्षु मार्बल समोर,८-मुळारोड खडकी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पुलावरुन यु-टर्न घेण्यास बंदी असताना देखील अचानकपणे यु-टर्न घेऊन,मोटार सायकलस्वार तिर्थराज लालबहादुर विश्वकर्मा,वय-३३ वर्षे,रा.चंदनगनर,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.भोसले ९८५०९११३११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ०१/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | संजय पवार,वय-४८,रा.सेनापती बापट रोड,पुणे |
| **आरोपी** | तीन विधीसंघर्षीत बालक,रा.शिवाजीनगर,पुणे (ताब्यात आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०१८ रोजी २०/१५ वा.पुणे मनपा सागवीकडे जाणा-या बस स्टॉप जवळील लोखंडी जीन्या जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सांगवीकडे जाण्यासाठी बस स्टॉपकडे जात असताना,यातील नमुद तीन विधीसंघर्षीत बालकांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे खिशात हात घालुन,त्यांचेजवळील १ हजार ६० रूपये जबरदस्तीने काढुन घेतले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.ए.खटके ९५५२७२१७२१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ०७/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | रचना पॉपकीस,वय-५१,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | राजन शर्मा,रा.सिध्दार्थनगर,औंध,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१२/१७ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम राजन शर्मा याने फिर्यादी यांना ऑनलाईन कॉक्रस पॅनीयल जातीच्या श्वान विक्रीचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन ८,०००/- रुपये घेऊन,त्यांना श्वान न देता त्यांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्रीकांत शिंदे ९८९२८००८५४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ०८/१८,भादविक ४३५,४२७,५०७ |
| **फिर्यादी** | दिपक वाघेलकर,वय- ३९ वर्षे,रा.शिवणे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०१८ राजी पहाटे ०२/०० वा. शांताई कॉप्लेक्स,दांगट पाटीलनगर,शिवणे,पुणे समोर रोडवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने शांताई कॉप्लेक्स,दांगट पाटीलनगर,शिवणे,पुणे समोर रोडवर पार्क केलेल्या हुडाई कंपनीची ॲसेंट कार व होंडा शाईन मोटार सायकल ही कशाचेतरी सहायाने जाळुन ६०,२००/- रु किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.पी.क्षीरसागर ९७३०८८८८३९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ०६/१८,भादविक ३२४,३८७,४५२,५०६(२),५०४ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३१ वर्ष,रा.पदमावती,पुणे |
| **आरोपी** | राजु उर्फ डड्या संजय लोंढे,वय-२० वर्षे,रा.तळाजाई वसाहत,पद्मावती,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०१८ रोजी १०/४५ वा. चे सुमारास फिर्यादीचे घरासमोर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम राजु उर्फ डड्या संजय लोंढ याने काहीएक कारण नसताना,फिर्यादी यांचे घराच्या दरवाजावर दगड मारुन,फिर्यादी व त्यांचे मुलास शिवीगाळ करुन त्यांचेकडे ५,०००/- रुची मागणी करुन,दोघांना त्याचे हातातील ब्लेडचा धाक धाकवुन त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी देवुन,हातातील ब्लेडने फिर्यादीचे मुलावर गालावर वार करुन,त्यास जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे घरासमोर मोठ-मोठयाने आरडा-ओरडा व शिवीगाळ करुन शेजारी राहणारे लोंकाचे घरावर व दरवाज्यावर दगड मारुन दहशत निर्माण केल्याने त्याचे दहशतीने शेजारी राहणा-या लोकांनी त्यांचे दरवाजे बंद करुन घेतले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एस.सरडे |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ०९/१८,भादविक ३५३,३४ |
| **फिर्यादी** | पो.ना. केदारी, सांगवी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.महादेव किशोर गोरे,वय-३५,रा.संभाजी नगर थेरगांव,पुणे २.सिध्देश्वर प्रभाकर कोटुळे,वय-४०,रा.द्वारकाधीश रेसी.पिंपळे-गुरव,पुणे ३.प्रसन्न विजय गायकवाड,वय-३१, रा.घर नं.६३,औंध,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१/१८ रोजी ०१/३० वा. राजीव गांधी पुला जवळ,औंध ते सांगवी फाटा पुणे दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रात्रपाळीसाठी त्यांचे कर्तव्यावर हजर असताना,रात्री उशिरा पर्यत चालु असलेल्या आस्थापना बंद करीत असताना,कारमधुन आलेल्या यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना अपशब्द वापरून,अरेरावीची भाषा बोलुन रोडवर पडलेला पेव्हींग ब्लॉक फिर्यादी यांचे दिशेने फेकुन मारुन,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बागुल ८९७५१५०६४० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ०२/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | माधवन नायर,वय-५५ वर्षे,रा.आदर्श कॉलनी,पुणे |
| **आरोपी** | अमिन बाबु शेख,वय-२२ वर्षे,रा.शांती नगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१८ रोजी १३/३० वा. ॲम्युनेशन फॅक्ट्री परिसरातील प्रुपरेंज येथील संरक्षक भिंती जवळ, खडकी,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम अमिन बाबु शेख याने नमुद वेळी व ठिकाणी प्रतिबंधीत क्षेत्रात विनापरवाना संरक्षक भिंतीवर चढुन आत मध्ये प्रवेश करुन,ॲम्युनेशन फॅक्ट्री परिसरातील १६२,एम.एम. मापाचे जळालेले पितळ या धातुचे अंदाजे १५ किलो वजनाचे फ्युज ३७५०/- रुपये किंमतीचे चोरून,पुन्हा संरक्षक भिंतीवर चढुन पळुन जात असताना सेक्युरीटी गार्ड यांना मिळुन आला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्ही.एस.आजगेकर ७७७४०३२४४६ |

## दि.०५/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८/२०१८,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | पांडुरगं करवंदे,वय-२१ वर्ष,रा.सागर आर्केड,सुनिता नगर,चंदननगर,खराडी-बायपास,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१८ रोजी २१/१० वा. भेकराई बस डेपोच्या आत मोकळया जागेत,फुरसुंगी, हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचा मित्र व्यंकट नारायण यास फोन लावुन त्यांना एका मुलीबाबतचे आपसातील भांडण बसुन मिटवुन घेवु असे म्हणुन नमुद ठिकाणी बोलावुन घेवुन, फिर्यादी यांचा मित्र व्यंकट नारायण यास बाजुला थांबवुन त्यांनी व त्यांच्या इतर दोन साथीदारांनी सोबत आणलेल्या धारदार शस्त्राने फिर्यादी यांचे डोक्यावर, हातावर, पायावर व पाठीवर वार करुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.व्हि.उमरे |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**